| | |
|---|---|
| MHSN080002192020 | दाखल तारीख – ०५.०२.२०२०<br>नोंदणी तारीख – ०५.०२.२०२०<br>निकाल तारीख – ०७.०४.२०२६<br>कालावधी – वर्षे – महिने – दिवस<br>०६ ०२ ०२ |

**जत येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालय,**
**(पिठासीन अधिकारी प्रकाश चु. बछले)**

**नियमित फौजदारी खटला क्र.३९/२०२०**
**निशाणी क्र.२१**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>जत पोलीस ठाणे. |
| अभियोग पक्षातर्फे | | श्री. अ. व. विरकर<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| | | |
| आरोपी | | **प्रकाश पांडुरंग वाघमोडे,**<br>वय–४० वर्षे, व्यवसाय – शेती,<br>रा. बिरनाळ, ता. जत, जि. सांगली. |
| आरोपीतर्फे वकील | | श्री. बी.वाय. गडदे |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | – | ०२.१२.२०१८ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | – | ३६६/२०१८ |
| फिर्याद दाखल दिनांक | – | ०५.१२.२०१८ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | – | ०५.०२.२०२० |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | – | २०.०१.२०२६ |

| | | |
|---|---|---|
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | – | २०.०१.२०२६ |
| युक्तिवाद दिनांक | – | ०७.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | – | ०७.०४.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | – | ---- |

**<u>आरोपीची माहिती</u>**

| अ. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र. सं.कलम ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रकाश पांडुरंग वाघमोडे | १५.०७. २०१९ | १६.०७. २०१९ | भा.दं.वि.स. कलम ३८०, ५०४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## भाग क

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. अभियोगपक्ष :**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १ | बिरा कृष्णा बंडगर | फिर्यादी |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असेल तर**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | – | – |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असेल तर**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| — | — | — |

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी**

**अ. अभियोगपक्ष**

| **अ नं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | _ | _ |

**ब. बचाव**

| **अ नं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| --- | -- | -- |

**क.न्यायालयीन निशाणी**

| **अ नं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | १८ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | १९ | निवेदन कम जप्ती पंचनामा |

**ड. भौतिक वस्तु**

| **अ नं.** | **वस्तु क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| --- | -- | -- |

## न्या य नि र्ण य
## (घोषित दिनांक ०७.०४.२०२६)

आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता १८६० (येथून पुढे संक्षिप्तपणे भा.द.वि. असे संबोधण्यात येईल) चे कलम ३८०, ५०४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढीलप्रमाणे –**

२. फिर्यादी बिरा कृष्णा बंडगर हे मौजे बिरनाळ, ता. जत येथील रहिवाशी

असून तेथे ते त्यांच्या कुटुंबासमवेत राहतात. आरोपी हे फिर्यादी यांच्या ओळखीचे असून त्यांनी दोन वर्षापुर्वी त्यांचेकडील जे.सी.बी. मशीनच्या सहाय्याने ग्रामपंचायतीच्या वतीने ५० लोकांच्या शौचालयाचे खड्डे काढून दिले होते. त्यावेळी फिर्यादी बिरनाळ गावचे सरपंच होते. खड्डे काढण्याचा खर्च संबंधित व्यक्तीकडून घेणेबाबत फिर्यादी यांनी आरोपीस सांगितले होते. तथापी, त्याबाबतचे पैसे आरोपींना संबंधिताकडून मिळाले नाहीत. त्यामुळे, आरोपी हे फिर्यादी यांच्याकडे वारंवार सदर पैशाची मागणी करीत होते. फिर्यादी यांनी पुढे असे कथन केले की, दिनांक ०२.१२.२०१८ रोजी रात्री ११.०० चे सुमारास फिर्यादी हे त्यांच्या दूध डेअरीमध्ये दूध संकलन करीत असताना आरोपी त्यांच्याजवळ आला. त्याने उर्वरित पैशाची मागणी करुन फिर्यादी यांना शिवीगाळ केली. फिर्यादी पैसे देण्याच्या संदर्भात समजावून सांगत असताना आरोपीने फिर्यादी यांची दूधाचे फॅट मोजण्याची मशिन त्यांच्या संमत्तीशिवाय चोरुन नेली. म्हणून आरोपी विरुध्द भा.द.वि.कलम ३८०, ५०४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद करणेत आला.

**३.** सदर गुन्ह्याचा तपास श्री. एस. जी. माने, पो.ना.ब.क्र.३००, जत पोलीस ठाणे यांनी केला. त्यांनी आरोपीस अटक केली. घटनास्थळ कम मुद्देमाल जप्तीचा पंचनामा करुन मुद्देमाल जप्त केला. चौकशीअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. निशाणी क्र.१२ कडे भा.द.वि.कलम ३८०,५०४ अन्वये आरोपीवर दोषारोप ठेवणेत आला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला पुढे चालविण्याची संमत्ती दर्शविली. गुन्हयामध्ये गोवविण्याइतपत पुरावा न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविणेत आले नाही.

**४.** प्रस्तुत प्रकरणातील सारांश तसेच अभिलेखावर दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकीलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत–

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०२.१२.२०१८ रोजी रात्री ११.०० वा. मनोज दूध संकलन, बिरनाळ, ता. जत येथे आरोपीने फिर्यादी यांच्या मालकीच्या दूधाचे फॅट मोजण्याची इकोमिल्क कंपनीच्या मशिनची चोरी केली म्हणून त्यांनी भारतीय दंड विधान कलम ३८० अन्वये गुन्हयाचे कृत्य केले ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय? | नाही. |
| २. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून त्यांचा अपमान करून ते सार्वजनिक शांततेचा भंग करतील असे प्रक्षोभन दिले आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ५०४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| ३. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

५. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत करण्याच्या दृष्टीने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फिर्यादी बिरा कृष्णा बंडगर यांना नि.१६ कडे तपासलेले आहे. घटनास्थळ पंचनामा व निवेदन कम जप्ती पंचनामा इ. कागदपत्रे आरोपीने मान्य केली असल्यामुळे त्यांना अनुक्रमे नि.१८ व १९ देण्यात आली.

**विचाराधीन बाबी क्र.१ व २ बाबत**:–

६. विचाराधीन बाबी क्र.१ व २ या एकमेकांशी निगडीत असल्याने व समान पुराव्यावरच अवलंबून असल्याने उपलब्ध असलेल्या पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी दोन्ही विचाराधीन बाबींचे विवेचन एकत्रीत केलेले आहे.

७. आरोपी विरुध्द गुन्हा शाबीतीकरिता अभियोग पक्षाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फिर्यादी बिरा यांना नि.१६ कडे तपासलेले आहे. त्यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी असे कथन केले की, घटना ४–५ वर्षापुर्वी घडली होती. वादावादी झाली

होती. त्यामुळे, त्यांनी पोलीस ठाणेत तक्रार दिली होती. तथापी, फिर्यादवर त्यांची सही असून त्यातील मजकूर त्यांना माहीत नाही. अशाप्रकारे साक्षीदारास घटनेसंदर्भात काहीएक सांगता आले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे, सदर साक्षीदाराला अभियोग पक्षातर्फे फितूर घोषीत करुन त्याचा विस्तृत उलटतपास घेतला. परंतु, अभियोग पक्षास मदत होईल असा कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. याउलट, फिर्यादी यांनी त्यांची मशिन चोरीला गेलीच नसल्याचे कथन केलेले आहे. आरोपी व त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याची वस्तुस्थिती मात्र फिर्यादी यांनी उलटतपासादरम्यान मान्य केलेली आहे. आरोपीतर्फे वकीलांनी फिर्यादी यांचा उलटतपास घेण्याचे नाकारले.

८. प्रस्तुत केसमधील फिर्यादी व आरोपी यांनी नि.क्र.१४ कडे अर्ज सादर करुन त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे कथन केले. परंतु भा.द.वि.कलम ३८० हा गुन्हा तडजोड पात्र नसलेने सदरचा अर्ज नामंजूर करणेत आला. फिर्यादी व आरोपी यांची संयुक्त तडजोड पुरशिस नि.१५ कडे दाखल आहे.

९. एकंदरीत अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर आलेला पुरावा विचारात घेता, ज्या व्यक्तीची वस्तू चोरीला गेलेली आहेत ती व्यक्तीच जर आरोपी विरुध्द न्यायालयामध्ये काहीही सांगत नसेल तर फिर्याद भारतीय पुरावा कायदयाप्रमाणे शाबीत झाली असे म्हणता येणार नाही. त्याचबरोबर आरोपीने घटनास्थळ कम मुद्देमाल जप्ती पंचनामा व निवेदन पंचनामा आरोपीने मान्य केला असला तरी, तो पुरावा म्हणून भारतीय पुरावा कायदयानुसार आरोपी विरुध्द वापरता येणार नाही. फिर्यादी यांनी अभियोग पक्षास सबळ पुरावा अभिलेखावर आणणेकरिता कोणत्याही प्रकारे सहाय्य केलेले नाही.

१०. एकंदरीत वरील सर्व विवेचनावरुन असे दिसते की, आरोपीवर भा.द.वि.कलम ३८०,५०४ अन्वये निश्चित करण्यात आलेले दोषारोप हे अभियोग पक्ष यांना संशयापलीकडे शाबीत करण्यास अपयश आलेले आहे. तसेच आरोपी विरुध्द कोणताही प्रत्यक्षदर्शी किंवा परिस्थितीजन्य पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदरची बाब विचारात घेता, आरोपी हा पुरेशा पुराव्या अभावी निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतो. प्रस्तुत प्रकरणात जप्त करणेत आलेली दुधाचे फॅट मोजण्याचे मशिन तिचे मूळ मालकास

कायमस्वरुपी परत देणे संयुक्तिक वाटते. म्हणून, मी विचाराधीन बाब क्र.१ व २ ची उत्तरे नकारार्थी नोंदवून विचाराधीन बाब क्र.३ करिता खालीप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी प्रकाश पांडुरंग वाघमोडे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३८०,५०४ या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

२. प्रस्तूत कामी जप्त करण्यात आलेली इकोमिल्क कंपनीची दुधाचे फॅट मोजण्याची मशिन ही मालकीची कागदपत्रे दाखल केल्यानंतर इतर कोणत्याही गुन्हयाचे कामी आवश्यकता नसल्यास व अदयापी मूळ मालकास परत दिली नसल्यास आव्हान कालावधीनंतर ती कायमस्वरुपी मूळ मालकास परत देण्यात यावी. तसेच आव्हान कालावधीनंतर ६ महिन्यांच्या आत कोणीही त्यावर हक्क न सांगितल्यास नियमाप्रमाणे तिचा जाहीर लिलाव करुन येणारी रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

३. आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) चे तरतुदीची पुर्तता करणेसाठी रुपये १५,०००/- चे बंधपत्र व जामीनपत्र पुढील सहा महिन्याचे कालावधीकरिता दयावा.

५. (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये पारित करणेत आला.)

PRAKASH CHUNNI BACHHALE
Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.04.07 17:10:43 +0530

दिनांक –०७.०४.२०२६
जत.

**(प्रकाश चु. बछले)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जत.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | R. B. Samalewale |
| Name of the Court | :- | Prakash C. Bachhale<br>Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Jath. |
| Date of decision | :- | 07.04.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 07.04.2026 |
| Order uploaded on | :- | 07.04.2026 |